28-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/27/2025 10:39 PM Page 1



## निवडक

### मल्लिकार्जुन महाविद्यालयात आज नेतृत्व विकास कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २७ :** देळे– काणकोण येथील श्री ज्ञान प्रबोधिनी मंडळाच्या श्री मल्लिकार्जुन व चेतन मंजू देसाई महाविद्यालयात दि. १ मार्च रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १.३० पर्यंत क्रीडा आणि युवा व्यवहार खात्याच्या संयुक्त विद्यमाने नेतृत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाविद्यालयाच्या सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाला पेडणे येथील संत सोहिरोबानाथ महाविद्यालयाचे क्रीडा संचालक कॅ डॉ. सॅम जोसेफ मस्कारेन्हास हे मार्गदर्शन करणार आहेत. डेक्कन फाईल केमिकल्स प्रकल्पचे व्यवस्थापक सिद्धेश कोचरेकर, सुखदा ट्युटोरिअल्सच्या संस्थापिका सुखदा श्रीहरी मराठे व्यवस्थापक सिद्धेश कोचरेकर सुखदा ट्युटोरिअल्सच्या संस्थापिका सुखदा श्रीहरी मराठे विशेष अतिथी म्हणून यावेळी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून विविध पावस्कर व करिष्मा पार्सेकर यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष चेतन मंजू देसाई, सचिव मंजुनाथ देसाई, खजिनदार राजेंद्र देसाई व प्राचार्य डॉ. सुचिता नायक उपस्थित राहणार आहेत.

### काणकात उद्यापासून योग शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २७ :** बार्देश पतंजली योग समिती व सिद्धपुरुष नारायण देवस्थान काणका( बार्देश) यांच्या सहयोगाने दि. २ ते ७ मार्चपर्यंत सकाळी साडेपाच ते ७ या वेळेत सिद्धपुरुष नारायण देवस्थान हॉल काणका येथे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या मोफत योग शिबिराचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी सांगितले आहे.

# पाकिस्तानविरुद्ध बांगलादेश सामना रद्द

## पावसाची जोरदार बॅटिंग, नाणेफेकीला ही व्यत्यय विजयाचे खाते न खोलल्यामुळे पाक अ गटात तळाला



**रावळपिंडी, दि. २७ :** पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चा ९वा सामना न खेळताच रद्द करण्यात आला आहे. या सामन्याची नाणेफेकदेखील होऊ शकली नाही. रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर होणारा हा सामना पावसामुळे रद्द झाला आहे. यासह, स्पर्धेतील पाकिस्तानी संघाचा प्रवास विजयाशिवाय संपुष्टात आला आहे. चालू स्पर्धेत पाकिस्तानी संघाचा समावेश गट अ मध्ये होता आणि त्यांना उपांत्य फेरी गाठता आली नाही. या गटातून भारत आणि न्यूझीलंड हे दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचले. पाकिस्तानसोबतच बांगलादेश संघही स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

अ गटातील पाकिस्तानच्या संघाने सुरूवातीचे दोन सामने गमावल्याने त्यांना उपांत्य फेरी गाठणे अवघड झाले. त्यामुळे पाकिस्तान या स्पर्धेतून बाहेर झाला आहे. या गटातून भारत आणि न्यूझीलंड हे दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. पाकिस्तानसोबतच बांगलादेशचा संघही स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

पावसामुळे पाकिस्तान–बांगलादेश सामन्याच्या नाणेफेकीला उशीर झाला. रावळपिंडीत ओल्या आऊटफिल्डमुळे सामना सुरू होऊ शकला नाही. सामन्यापूर्वी कोसळणारा पाऊस नुकताच थांबला होता. मात्र, ओल्या मैदानामुळे सामना सुरु होऊ शकला नाही. पाकिस्तानी संघाला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ६० धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. यानंतर, भारतीय संघाने त्यांना ६ विकेट्सने पराभूत केले आणि आता त्यांचा बांगलादेशविरुद्धचा सामना रद्द करण्यात आला.

चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद भूषवणारा आणि स्पर्धेत एकही सामना जिंकू न शकलेला पाकिस्तानी संघ केनियानंतरचा दुसरा संघ ठरला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २000 मध्ये जेव्हा केनिया हा यजमान संघ होता तेव्हा तो फक्त एकच सामना खेळला आणि पराभूत झाला होता. यासह यजमान पाकिस्तानचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील अ गटात शेवटच्या स्थानी राहिला आहे. पाकिस्तानच्या खात्यात एक गुण आहे तर संघाचा नेट रन रेट –१.०८७ आहे. तर बांगलादेशचा संघ तिसऱ्या स्थानी असून त्यांच्या खात्यातही एक गुण आहे. पण त्यांचा रन रेट –0.४४३ आहे. जो पाकिस्तानपेक्षा चांगला आहे. तर न्यूझीलंड आणि भारत अनुक्रमे चार गुणांसह पहिल्या–दुसऱ्या स्थानी आहे. तर अ गटातील अखेरचा सामना भारत–न्यूझीलंड यांच्यात होणार आहे.

### तरीही पाकिस्तानचा संघ होणार मालामाल

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये पाकिस्तान संघाची मोहिम निराशाजनक राहिली. तब्बल २९ वर्षांनंतर आयसीसी स्पर्धेचे पाकिस्तानात आयोजन करण्यात आले होते. मात्र, सध्या सुरू असलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पाकिस्तान संघाचा प्रवास संपुष्टात आला आहे. पाकिस्तान संघाला एकही सामना जिंकता आला नाही. पाकिस्तानचा संघ गट टप्प्यातून बाहेर पडला असला तरी आयसीसीकडून पाकिस्तान संघाला कोट्यवधींची बक्षिसाची रक्कम मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) कोट्यवधी रुपये बक्षीस देणार आहे. संघही एकही सामना जिंकलेला नसला तरी आयसीसीच्या परंपरेनुसार त्याला बक्षीस रक्कम म्हटले जाईल. पाकिस्तानला आयसीसीकडून बक्षीस म्हणून सुमारे २ कोटी ३७ लाख रुपये मिळणार आहेत. यामधील १ कोटी २२ लाख रुपये गुणतालिकेत सातव्या आणि आठव्या स्थानावर असलेल्या संघांना मिळणार होते, त्यामुळे पाकिस्तानला ती रक्कम मिळेल. यासह सामना जिंकण्यासाठी प्रत्येक संघाला २९.५ लाख रूपये मिळतील. बांगलादेशविरूद्धचा सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना याची अर्धी किंमत मिळेल. म्हणजेच पाकिस्तानला १५ लाख रूपये मिळतील. याशिवाय आयसीसीने यावेळी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये सहभागी होणाऱ्या सर्व संघांना प्रत्येकी १.०८ कोटी स्वतंत्र रक्कम देण्याची घोषणा केली होती. अशा प्रकारे एकूण पाकिस्तान क्रिकेट संघाला २ कोटी ३७ लाख रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत. आयसीसीकडून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला यजमानपद भूषवल्याची वेगळी रक्कम मिळणार आहे.




## म्हापसा ड्रीम क्रशर्सची विजयाने सांगता; प्रायॉरिटी टायटन्स अव्वल

**मडगाव, दि. २७ :** गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने मडगावच्या एमसीसी मैदानावर आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० क्रिकेट स्पर्धेत रविवारी म्हापसा ड्रीम क्रशर्सने रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजचा ९० धावांनी पराभव केला. दोन्ही संघ अंतिम चारच्या स्पर्धेतून यापूर्वीच बाहेर पडले होते. त्यामुळे या सामन्याला फारसे महत्त्व नव्हते. दिवसातील दुसऱ्या सामन्यात प्रायॉरिटी टायटन्सने सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सला ३ गडी राखून पराभव करताना अव्वल स्थान प्राप्त केले. आता क्वॉलिफायर १' मध्ये देखील हेच दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत.

दिवसातील पहिल्या सामन्यात ड्रीम क्रशर्सने २० षटकांत सर्वबाद २२४ अशी विशाल धावसंख्या उभारली. यानंतर रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजने १७ षटकांत ८ बाद १३४ धावा केल्या. २३ चेंडूंत ३८ धावा केलेला राजाराम कुंडईकर या सामन्याचा मॅन ऑफ द मॅच ठरला. दुसऱ्या सामन्यात सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १३५ धावा केल्या. प्रायॉरिटीने १८ षटकांत ७ गडी गमावून १३७ धावा करत सामना जिंकला. २८ धावांत ३ बळी व १७ धावांचे योगदान दिलेला कपिल सिनाय बोरकर या सामन्याचा मॅन ऑफ द मॅच ठरला.

संक्षिप्त धावफलक – म्हापसा ड्रीम क्रशर्स – २० षटकांत सर्वबाद २२४ (राजाराम कुंडईकर ३८, नित्यय कुंकळ्येकर ३७, शैलेश महाजन ३६, व्यंकटेश वेर्लेकर २८, मेहंक धारवाडकर २२, देवकीनंदन प्रभू ३५–३, गौरीश शेणवी लोटलीकर १२–१, अनिकेत कामत १५–१, तन्मय सुखथनकर ३०–१) विजयी वि. रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज – १७ षटकांत ८ बाद १३४ (विवेक केणी ३८, गौरीश शेणवी लोटलीकर ३३, प्रशील कामत ११, महेश च्युरी १३–२, मेहंक धारवाडकर २४–१, व्यंकटेश वेर्लेकर २५–१, नित्यय कुंकळ्येकर १२–१)

सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – २० षटकांत ९ बाद १३५ (सिद्धित रायतुरकर ३८, अच्युत नाईक दलाल २२, रौनक नारगुंडकर नाबाद १२, संदीप दलाल ११, कपिल सिनाय बोरकर २८–३, स्मितेश दिवेकर १३–३, विक्रांत प्रभू १६–१, सिद्धार्थ घाणेकर २७–१) पराभूत वि. प्रायॉरिटी टायटन्स – १८ षटकांत ७ बाद १३७ (मनीष काकोडे ३५, विक्रांत प्रभू २२, समर दुभाषी १९, कपिल सिनाय बोरकर १७, यश प्रभुगावकर २०–२, सिद्धेश प्रभू अळवेणकर ३६–१, सिद्धांत आमोणकर १७–१, संदीप दलाल २२–१)



मडगाव: पायाभरणी केल्यानंतर आमदार उल्हास तुयेकर, जिल्हा पंचायत सदस्य सिप्रु कार्दोझ, सरपंच, पंच सदस्य व इतर मान्यवर

## नावेलीच्या साळपे तळ्याच्या सौंदर्यीकरणाचे काम सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ ५ कोटी खर्चणार : तुयेकरांच्या हस्ते पायाभरणी**

मडगाव, दि.२७ : नावेली येथील साळपे तळ्याची सफाई व सौंदर्यीकरणाचे काम सुरु करण्यात ले असून नावेलीचे आमदार व कदंब महामंडळाचे अध्यक्ष उल्हास तुयेकर यांच्या हस्ते या कामाची मंगळवारी पायाभरणी करण्यात आली. जलसंपदा खात्यातर्फे ५ कोटी रुपये खर्चून हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.नावेलीचे वैशिष्ट्य असलेले हे तळे प्रदुषित झाल्याने येथील शेतकऱ्यांनी शेती करण्याचे सोडून दिले होते. शेतकरी तसेच नावेलीवासीयांकडून या तळ्याची सफाई व सौंदर्यीकरणाची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार सफाई व सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून शेतकऱ्यांना तसेच परिसरातील लोकांना याचा लाभ होईल, असे तुयेकर यांनी यावेळी सांगितले. नावेली चर्चचे फा. गाब्रियल, नावेलीचे जिल्हा पंचायत सदस्य एडवीन (सिप्रू) कार्दोझ, नावेलीचे सरपंच मायकल कार्दोझ, तळावलीचे उपसरपंच स्टीव्हन गोयस, नावेलीचे पंच दामोदर चव्हाण आके बायशचे पंच अविनाश सरदेसाई, अमिशा तिळवे, रुमडामळ दवर्लीच्या माजी पंच मधुकला शिरोडकर, नावेली भाजप मंडळाचे सरचिटणीस दीपक सावंत व प्रमोद प्रभू तसेच दिनेश महाले उपस्थित होते.



## विद्यार्थी प्राथमिक शाळेतच सुसंस्कारित बनतात : डॉ. भगत

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ घाणो – सावई येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलन**

**सावईवेरे दि. २७ :** माणसाने कितीही उच्च पदवी संपादन केली तरी प्राथमिक शाळेतील शिक्षक सदैव विद्यार्थ्यांच्या मनात राहतात. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार झाले तरच विद्यार्थी सुशिक्षित व सुसंस्कारित बनतात, असे प्रतिपादन डॉ. गोविंद भगत यांनी केले.

घाणो – सावई येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. भगत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वळवईचे सरपंच विनायक वेंगुर्लेकर, बी . आर् . सी. मनिषा आचार्य, वेरे – वाघुर्मे ग्रामपंचायतीचे उपसरपंच बाबू गावडे, गणेश गावणेकर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजीव घाडी उपस्थित होते.

प्रा. भगत म्हणाले की, या शाळेतील विद्यार्थीच सुंदररित्या कार्यक्रमाचे सूत्रनिवेदन करतात, ते पाहून अतिशय आनंद झाला.

शिक्षिका मयुरी वळवईकर , स्मया प्रभू, वेदांशी सावईकर, अर्चिता सावईकर यांनी मान्यवरांची ओळख करून दिली. पाहुण्यांच्या हस्ते शाळेत तयार केलेल्या 'घाणो ' या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. मुख्याध्यापिका स्वप्नाली वळवईकर यांनी हस्तलिखितसंबंधी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. बक्षिसांची यादी रसिका मराठे यांनी सादर केली.

# नियमित खेळामुळे आरोग्य राहते तंदुरूस्त

## प्राचार्य नामदेव गावस : साखळी सरकारी महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड



साखळी: विजेत्या खेळांडूसमवेत प्रमुख पाहुणे डॉ. सनी रामदास काणेकर, सन्मानीय पाहुणे उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक सिद्धेश केसरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाचे संचालक साईश गोलतकर व इतर मान्यवर.

**साखळी, दि. २७ :** क्रीडा दिनामुळे खेळांविषयीची भावना वाढीस लागते. तसेच खेळांमुळे आरोग्यही तंदुरूस्त राहते, असे कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी सांगितले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग व विद्यांर्थी परिषदेच्या सहकार्याने वार्षिक क्रीडा दिन उत्साहात पार पडला. हा वार्षिक क्रीडा दिन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य गावस बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विद्याप्रबोधिनी वाणिज्य, शिक्षण, संगणक आणि व्यवस्थापन महाविद्यालय पर्वरीचे क्रीडा संचालक डॉ. सनी काणेकर, सन्माननीय पाहुणे म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक सिद्धेश केसरकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाचे संचालक साईश गोलतकर आदी मान्यवर उपस्थित होते. वार्षिक क्रीडा दिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. गावस यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर महाविद्यालयाचा ध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्यावतीने ग्रॅण्ड मार्च काढण्यात आला. तसेच यावेळी प्रेरणादायी मशाल रिलेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. सनी रामदास काणेकर आणि सहायक संचालक सिद्धेश केसरकर यांचे विद्यार्थ्यांना संबोधून प्रेरणादायी मनोगत झाले. या मनोगतानंतर प्रमुख पाहुण्यांच्या परवानगीने विविध स्पर्धांना सुरुवात झाली.

उद्‌घाटनानंतर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांसाठी १०० मीटर, २००मीटर, ४००मीटर आणि ८००मीटर धावण्याच्या शर्यतीचे आयोजन करण्यात आलेले होते. याशिवाय ४ गुणिले १०० मीटर रिले (पुरुष आणि महिला) ४ गुणिले ४०० मीटर रिले (पुरुष) आणि मिश्र रिले या स्पर्धांचा समावेश होता. तर प्राध्यापकांसाठी कंट्रोल क्रिकेट आणि थ्रोबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. वार्षिक क्रीडादिन २०२४–२०२५ यामध्ये विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापकांचा उत्साहही कमालीचा होता. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत प्राध्यापकांनीही स्वत:मधल्या क्रीडागुणांचे दर्शन घडविले. प्रमुख पाहुणे व मान्यवर यांच्याहस्ते विजेत्या खेळाडूंना बक्षीस वितरण करण्यात आले. त्यानंतर क्रीडा प्रशिक्षक डोराथी आल्फान्सो यांनी आभार मानले.




मडगाव : उपविजेत्या संघाबरोबर प्राचार्य मनोज कामत व इतर मान्यवर.

## सिनाई धेंपे महाविद्यालयाला 'वर्डसअप चॅलेंज'चे उपविजेतेपद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.२७ :** कुजिरा बांबोळी येथील श्रीनिवासा सिनाई धेंपे महाविद्यालयाच्या इंटिग्रेटेड एमकॉम, बीबीए आणि बीकॉमच्या ३६ विद्यार्थ्यांच्या संघाने म्हापसा येथील सेंट झेवियर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय 'वर्डसअप ६.0' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. धेंपे महाविद्यालय (स्वायत्त) संघाने एकूण १७ राष्ट्रीय संघांशी स्पर्धा करून अनेक वैयक्तिक पारितोषिकांसह सांघिक चषक प्राप्त केले. एसएस डेम्पो महाविद्यालयातील संघाला इंग्रजी विभागातील सहाय्यक प्राध्यापिका रतिका राणे आणि दीक्षा हळर्णकर यांचे मार्गदर्शन लाभले. या संघाने रुपये १५000 रोख, सांघिक चषक आणि वैयक्तिक बक्षिसे मिळवली. सहभागी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. मनोज कामत यांच्या हस्ते सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकातून देण्यात आली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 175 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .